# अरूणशेठ भगत यांच्या हस्ते वाघच्याची वाडी येथील बोअरवेलचे उदघाटन

पनवेल (प्रतिनिधी) टेंभोडे वाघच्याची वाडीमध्ये बोअरवेल, पाईपलाईन, स्टॅन्ड पोस्ट व पाण्याची टाकीची उभारणी करून नळ पाणी पुरवठा करण्यात आला असून त्याचे उदघाटन तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी झाले.

यावेळी अरूणशेठ भगत म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्वःखर्चातून या आदीवासी वाडीमधे नळ पाणी पुरवठा करण्यात आल्याने येथील आदिवासी कुंटूंब सुखावले आहेत. विधानसभा मतदार संघात एकही गावपाडा शिल्लक नाही जेथे लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकाम झाले नाही. पनवेल विधानसभा मतदार संघात सर्वाधिक विकासकामे करण्याचा विकम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केला असून त्यांनी केलेल्या कार्याची नोंद इतिहासात होईल. शहराबरोबरच ग्रामीण भागाला न्याय देण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे, म्हणूनच येथील जनता आमदार प्रशांत ठाकूर यांना विकासपुरूष म्हणूनच ओळखतात, असे गौरवोदगार तालुका कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांनी उदघाटनाप्रसंगी काढले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार निधी तसेच इतर शासकीय निधीतून पनवेल विधानसभा क्षेत्रातील गावांमध्ये मोठया प्रमाणात विकासकामे करण्यात आली आहेत. तालुक्यातील ज्या ठिकाणी तांत्रिक अडचणी येतात अशा ठिकाणी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर स्वःखर्चाने विकासकामे केली जातात. ०१ लाख २२ हजार रूपये खर्च करून टेंभोडे वाघच्याची वाडीमध्ये बोअरवेल, पाईपलाईन, स्टॅन्ड पोस्ट व पाण्याची टाकीची उभारणी करून नळ पाणी पुरवठा करण्यात आला. यावेळी पनवेल विधानसभा युवक कॉंग्रसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे, सरपंच काळूराम कडू, रवि पाटील, सदाशिव म्हस्कर, विठठल गायकवाड, एन.पी.तिवारी, नितीन जोशी, महादेव मदे, रामा चौधरी, जोमा निरगुडा, कानु मदे, बाळाराम निरगुडा यांच्यासह कार्यकर्ते आणि आदिवासी बंधु-भगिनी उपस्थित होते.